Pune Police

# प्रेसनोट दि. ०५/०८/२०१९

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडुन जुगार अड्ड्यावर छापा

दि.५/८/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस शिपाई शशांक खाडे यांना व्हि आय टी हॉस्टेल चौक, कोंढवा पुणे येथे बेकायदेशीर जुगार अड्डा चालु असलेबाबत गोपनीय माहीती मिळालेने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिसाळ व पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे सामाजिक सुरक्षा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ बातमीची पडताळणी करुन व्हि आय टी हॉस्टेल, चौकामध्ये कोंढवा पुणे येथे चालु असलेल्या बेकायदेशीर मटका अड्ड्यावर छापा टाकुन एकुण ३५,६००/- रु. किंमतीचा माल त्यामध्ये रोख रक्कम व जुगाराचे साहीत्य असा माल जप्त करुन जुगार घेणारे व खेळणारे असे एकुण ९ आरोपीं यांचेविरुध्द कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

वरील नमुद कारवाई ,श्री. बच्चनसिंग पो.उप.आयुक्त गुन्हे, पोनि वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिसाळ व पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे सामाजिक सुरक्षा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पो हवा क्षिरसागर, पो ना चव्हाण, पो शि खाडे व पो शि चव्हाण आणि कोंढवा पोलीस स्टेशन कडील पोलीस स्टाफ यांनी केलेली आहे.